'सेकंड इनिंग'

# खेड्यांकडे चला!



चित्र : अभय पुरंदरे

आमच्या घरातील एकूण सांस्कृतिक व पारंपरिक वातावरणाचा परिणाम आम्हा चारही भावंडांवर झालेला आढळतो. बाबांच्या (कै. पंडित सी. आर. व्यास - यांना माझे काका असले तरी लहानपणापासून बाबांच्या नावेच हाक मारण्याची सवय) व्यस्त जीवनाचा व सतत दुसऱ्यास मदत करण्याचा प्रभाव आमच्यावर झाला आहे. त्यामुळे 'फर्स्ट इनिंग'मध्ये नोकरी करतानासुद्धा जास्त वेळ मिळावा व समाजासाठी काहीतरी करता यावे, या हेतूने प्राध्यापकी पेशातील नोकरीची निवड केली. मुंबईत वस्त्या व झोपड्यांतून संस्कार वर्ग- अभ्यासिका- आरोग्य शिबिरांसारखे उपक्रम राबवत असताना शहरांपेक्षा ग्रामीण भागातील समस्यांची व गरजांची जाणीव वाढू लागली व त्यातूनच निम्मी नोकरी पूर्ण केल्यावर ग्रामीण भागातील समस्यांचा अभ्यास करून त्यासाठी काहीतरी करण्याचा निर्णय घेतला व प्रथम पुण्यात १९९१ मध्ये घर हलवले.

पुणे-मुंबई प्रवास करत करत मुळशी तालुक्यात ग्रामीण विकासाचे काम सुरू करण्याचा निर्णय घेतला व कोथरूड परिसरातील मुळशी तालुक्याशी संबंधित उद्योजक, तज्ज्ञ व रहिवासी यांना एकत्र करून १९९५ मध्ये राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्थेची स्थापना केली व प्रत्यक्ष कार्यास सुरवात केली.

ग्रामीण जनतेच्या अडीअडचणी समजावून घेणे व त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करणे, या दिशेने वाटचाल सुरू झाली. शिक्षण- आरोग्य- कृषी- स्वावलंबन- महिला सबलीकरण आधारित ग्रामविकासाचे लक्ष्य ठेवून कामास सुरवात केली. बारा वर्षे मुंबई-पुणे प्रवास करत असतानाच काम करत गेलो व २००३ मध्ये कामाचा व्याप एवढा वाढत गेला व नोकरी करणे गरजेचे नाही; घर स्थिरस्थावर झाले आहे, हे लक्षात घेऊन नियोजित वेळेच्या आधी दहा वर्षे स्वेच्छानिवृत्ती घेतली व पहिली इनिंग लवकर संपवून दुसरी अर्धवट सुरू असलेली इनिंग पूर्ण वेगाने सुरू केली.

मुळशी तालुक्यातील माले केंद्र धरून ३०-३५ गावांतून ग्रामीण विकासाचे काम त्यामुळे मार्गी लागत आहे, असे वाटते. सुरवात करताना विविध गावांतून संपर्क करून शेतकरी मेळावे घेतले व त्यात असले खोऱ्यातील ५-६ दुर्लक्षित गावे लक्षात

केला व त्यातून स्वामी विवेकानंद विद्यालय शाळेची स्थापना १९९५ मध्ये झाली. पुण्यातील देणगीदार व सहानुभूतिदार यांच्या सहकार्याने ११ वर्षे विनाअनुदान तत्त्वावर शाळा चालवली. आजही शाळा हे ग्रामीण भागातील शाळांचे आकर्षण ठरत आहे. कारण नियमित शालेय उपक्रमांबरोबरच शाळाबाह्य अनेक उपक्रम राबवले जात आहेत व त्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाकडे जास्त लक्ष दिले जात आहे. विद्यार्थ्यांतील कला-गुणांना वाव मिळवून देणे, त्यांच्या शारीरिक क्षमतांचा उपयोग करून त्यांना विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी करून घेणे, हुशार विद्यार्थ्यांना जास्त मार्गदर्शन करणे, भावी जीवनाविषयी व शिक्षणाविषयी मार्गदर्शन करणे, व्यवसाय प्रशिक्षण आठवीपासूनच (पाबळच्या विज्ञानाश्रमाचा अभ्यासक्रम) राबवणे, असे सर्व विषय केले जात आहेत.

१९९६ मध्ये श्रेयसचे श्री. चिंतामणी चितळे यांची भेट झाली व त्यातून वसतिगृह योजना पुढे आली. आज दोन मुलांची व एक मुलींचे, अशी तीन वसतिगृहे डोंगरदऱ्यांत राहणाऱ्या ४० विद्यार्थ्यांसाठी चालवली जात आहेत. त्यासाठी वारजे, कर्वेनगर परिसरातील २५०-३०० घरांतून एक मूठ धान्य योजना राबवली जात आहे.

तालुक्यातील गावांसाठी पाणी अडवा-जिरवाचे सर्वेक्षण करून घेणे व शक्य असेल तेथे निधी उपलब्धतेनुसार बंधारे घालण्याचे कामही संस्थेतर्फे केले जात आहे. श्रीमती विद्याताई केतकर यांनी दिलेल्या देणगीतून एक बंधारा भादस या गावी बांधला आहे. या वर्षी महिला सबलीकरणावर जास्त भर देऊन २४-२५ बचत गट स्थापन केले आहेत व त्यांना योग्य ते मार्गदर्शन सौ. स्वाती कदम यांच्यामार्फत दिले जात आहे.

गेल्या १२ वर्षांत ४६ रुग्णांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया, महिला आरोग्य शिबिरे, कान-नाक-घसा तपासणी व उपचार; असदे व भादस या गावी रामकृष्ण मठाच्या माध्यमातून साप्ताहिक दवाखाना, असे वेगवेगळे आरोग्यविषयक उपक्रम राबवले जात आहेत.

शेती मेळावे, चतुःसूत्री भात पद्धत, गांडूळखत प्रशिक्षण, सेंद्रिय शेती, असे अनेक विषय शेतकऱ्यांपर्यंत पोचवले आहेत. वसतिगृहातील माजी विद्यार्थी शेखर म्होकरच्या माध्यमातून ४-५ गावांतील ७५ ते ८० टक्के शेतकरी त्याचा लाभ घेत

वेळ देऊन कामाचा वेग वाढवत आहेत.

दोन-तीन कार्यकर्त्यांच्या आधारावर सुरू केलेल्या प्रकल्पात आज पुण्यातून १५-२० निवृत्त नागरिक आपल्या सेकंड इनिंगचा काही भाग देत आहेत. मुळशी तालुक्यातील २०-२५

२५०-३०० कुटुंबांना हा आपला प्रकल्प आहे, असे वाटते. सेकंड इनिंगमधील प्रवास अजून भरपूर करावयाचा आहे. साथीदार मिळत आहेत व आनंद द्विगुणित होत आहे.

**अनिल व्यास**